## निवडक




### राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत विवेकानंद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. २५ :** क्रीडा व युवा व्यवहार संचालनालयातर्फे पेडे म्हापसा येथील मैदानावर आयोजित केलेल्या ४६ व्या राज्य पातळीवरील ॲथलेटिक्स स्पर्धेत केरी–सत्तरी येथील विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद ज्ञान मंदिर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. गोळाफेक स्पर्धेत उस्मान करोल याने सुवर्णपदक, थाळी फेकमध्ये कांस्यपदक प्राप्त केले. पियुष गावकर याने उंच उडीमध्ये सुवर्णपदक पटकाविले. इयत्ता ८ वीत शिकणाऱ्या उस्मान याने तालुका पातळीवर गोळाफेकमध्ये सुवर्णपदक, थाळी फेकमध्ये सुवर्णपदक,विभागीय पातळीवर गोळा फेकमध्ये सुवर्णपदक,थाळी फेकमध्ये रौप्यपदक, राज्य पातळीवर गोळा फेकमध्ये सुवर्णपदक व थाळी फेकमध्ये कांस्यपदक प्राप्त केले आहे. तालुका,जिल्हा व राज्य पातळीवर सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल त्याला 'गोल्डन बॉय' पुरस्कार शिक्षक संदेश केसरकर यांनी जाहीर केला आहे. विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक गोपीनाथ गावस यांच्या मार्गदर्शनाखाली शारीरिक शिक्षक संदेश केसरकर यांनी प्रशिक्षण दिले.

# केकेआर – पंजाब आज भिडणार

## 'प्ले ऑफ' गाठण्यासाठी दोन्ही संघ आतुर : अय्यरला रोखण्याचे रहाणेसमोर असणार आव्हान

**कोलकाता, दि. २५ :** गेल्या हंगामात कोलकाता नाईट रायडर्सना जेतेपद मिळवून देणारा श्रेयस अय्यर उद्या शनिवारी ईडन गार्डन्सवर होणाऱ्या महत्त्वाच्या आयपीएल सामन्यात त्याच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्ज यजमान संघाशी भिडेल. प्लेऑफ पात्रतेच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा असेल. अय्यरच्या नेतृत्वाखाली केकेआरने एका दशकात गेल्या वर्षी पहिले आयपीएल जेतेपद जिंकले आहे. उद्या शनिवारी, तो प्रतिस्पर्ध्याची जर्सी घालेल आणि पंजाबला प्लेऑफमध्ये नेण्याच्या दिशेने पुढचे पाऊल टाकण्यासाठी सज्ज असेल. पंजाबने या हंगामात कोलकाताला एकदा पराभूत केले आहे आणि त्यामुळे ते यजमानांना दुहेरी धक्का देण्याचा प्रयत्न करतील.

केकेआरने अय्यरला सोडून देऊन सर्वांना आश्चर्यचकित केले. अय्यरने पंजाब किंग्जचे कर्णधारपद घेतल्यानंतर चांगलाच संघ फॉर्मात आला आहे. दिल्ली कॅपिटल्सचे



मार्गदर्शक रिकी पॉन्टिंग यांच्यासोबत, अय्यरने पंजाबला आठ पैकी पाच सामन्यांमध्ये विजय मिळवून दिला आणि गुणतालिकेत पाचव्या स्थानावर पोहोचला.

अय्यरने तीन अर्धशतकांसह २६३ धावा केल्या आहेत. आता त्याचा हेतू शतक ठोकण्याचा असेल. आता, त्याच्याकडे केएल राहुलप्रमाणेच त्याच्या बॅटने उत्तर देण्याची सुवर्णसंधी आहे, ज्याप्रमाणे त्याने नाबाद अर्धशतक झळकावून दिल्ली कॅपिटल्सला त्याच्या माजी संघ लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध विजय मिळवून दिला होता.

दुसरीकडे, केकेआरने आठ पैकी पाच सामने गमावले आहेत आणि आणखी एका पराभवामुळे प्लेऑफमध्ये जाण्याचा त्यांचा मार्ग अशक्य होईल. त्यांची टॉप ऑर्डर चांगली कामगिरी करत नसून आणि मधली ऑर्डर जबाबदारीने खेळत नाही. त्यांच्या बालेकिल्ल्यात, ईडन गार्डन्समध्ये फिरकी हल्ला अपयशी ठरला आहे. त्याला कोणत्याही परिस्थितीत पुढील सहापैकी पाच सामने जिंकावे लागतील.

केकेआरचे मधल्याफळीतील फलंदाज आंद्रे रसेल, रिंकू सिंग आणि रमणदीप यांना अंतिम टच देण्यात अपयश आले, त्यामुळे संघात बदल करावे लागू शकतात. केकेआर आता कॅरिबियन अष्टपैलू रोवमन पॉवेलला मैदानात उतरवू शकते. अंगकृष रघुवंशीला, अर्शदीप सिंग आणि युजवेंद्र चहल सारख्या गोलंदाजांच्या आव्हानाचा सामना करावा लागेल.

कर्णधार अजिंक्य रहाणेलाही चांगले प्रदर्शन करावे लागेल कारण तो जलद खेळून संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला आहे. त्यांना चहलपासून सावध राहावे लागेल, ज्याने गेल्या आठवड्यात धोकादायक स्पेल टाकला आणि रहाणे, रघुवंशी, रिंकू आणि रमणदीप यांचे बळी घेतले.

केकेआरचा गोलंदाज हर्षित राणा आणि पंजाबचा सलामीवीर प्रियांश आर्य यांच्यातील संघर्षही पाहण्यासारखा असेल. यावेळी केकेआरने त्यांच्या घरच्या मैदानावर चारपैकी फक्त एकच सामना जिंकला आहे. क्युरेटर सुजन मुखर्जी यांच्याशी खेळपट्टीबाबत झालेला अनावश्यक वादही चर्चेत आहे.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :**

**पंजाब किंग्स :** श्रेयस अय्यर (कर्णधार), प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग (यष्टीरक्षक), नेहल वढेरा, शशांक सिंग, ग्लेन मॅक्सवेल, मार्कस स्टॉइनिस, मार्को जॅनसेन, युझवेंद्र चहल, अर्शदीप सिंग, यश ठाकूर, सूर्यांश शेडगे, प्रवीण दुबे, विराजमान दुबे, वीरकुमार विजय, ब्रह्मांड, विजय. उमरझाई, जोश इंग्लिस.

**कोलकाता नाईट रायडर्स :** अजिंक्य रहाणे, रिंकू सिंग, क्विंटन डिकॉक, रहमानउल्लाह गुरबाज, अंगक्रिश रघुवंशी, रोवमन पॉवेल, मनीष पांडे, लवनीथ सिसोदिया, व्यंकटेश अय्यर, अनुकुल रॉय, मोईन अली, रमणदीप सिंग, आंद्रे रसेल, न्रिक नॉर्टजे, वैभव अरोरा.

# राजस्थानच्या प्ले ऑफच्या आशा संपुष्टात

**बंगळुरू, दि. २५ :** आरसीबी संघाने राजस्थान रॉयल्सचा गुरुवारी झालेल्या सामन्यात ११ धावांनी पराभव करून प्लेऑफकडे वाटचाल केली. यासह, प्लेऑफची शर्यत खूपच रोमांचक झाली आहे. आता आयपीएल २०२५ च्या प्लेऑफच्या शर्यतीत ६ संघ सहभागी आहेत, त्यापैकी तीन संघांचे १२ – १२ गुण आहेत. त्याच वेळी, पराभवासह राजस्थान रॉयल्सच्या प्लेऑफच्या आशा जवळजवळ संपल्या आहेत. गुजरात टायटन्स संघ आयपीएल २०२५ च्या पॉइंट टेबलमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. संघाने आतापर्यंत एकूण ८ सामने खेळले आहेत, त्यापैकी त्यांनी ६ जिंकले आहेत आणि फक्त २ सामने गमावले आहेत. त्यांचा नेट रन रेट प्लस १.१०४ आहे. सध्या त्यांचे १२ गुण आहेत. दिल्ली कॅपिटल्स संघ पॉइंट टेबलमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यांनी आतापर्यंत ६ सामने जिंकले असून त्यांचा नेट रन रेट प्लस ०.६५७ आहे आणि १२ गुण आहेत. आरसीबी संघ तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने आतापर्यंत ९ सामने खेळले आहेत आणि ६ जिंकले आहेत. १२ गुणांसह, त्याचा नेट रन रेट प्लस ०.४८२ आहे.

दिल्ली कॅपिटल्स, गुजरात टायटन्स आणि आरसीबी, तिन्ही संघांचे प्रत्येकी १२ गुण आहेत आणि त्यांचा प्लेऑफमध्ये प्रवेश जवळजवळ निश्चित आहे, कारण दिल्ली आणि गुजरात दोघांचेही प्रत्येकी ६ सामने शिल्लक आहेत, त्यापैकी त्यांना प्लेऑफचे तिकीट निश्चित करण्यासाठी प्रत्येकी तीन सामने जिंकावे लागतील. चालू हंगामात राजस्थान रॉयल्स संघाने एकूण ९ सामने खेळले आहेत, त्यापैकी त्यांनी फक्त २ जिंकले आहेत आणि ७ सामने गमावले आहेत. चार गुणांसह, त्यांचे नेट रन नेट मायनस ०.६२५ आहे. ते पॉइंट टेबलमध्ये ८ व्या क्रमांकावर आहे. राजस्थानचे अजूनही ५ सामने शिल्लक आहेत. जर त्यांनी हे पाचही सामने जिंकले, तर हंगामाच्या लीग टप्प्यानंतर त्यांचे एकूण १४ गुण होतील आणि कोणत्याही संघाला १४ गुणांसह प्लेऑफमध्ये पोहोचणे इतके सोपे नाही. त्यांना इतर संघांवरही अवलंबून राहावे लागेल. आता जर राजस्थान संघ येथून प्लेऑफमध्ये पोहोचला तर ते चमत्कारापेक्षा काही कमी नसेल.

**आरसीबीचा राजस्थानवर शानदार विजय**

आरसीबीने अखेरीस यंदाच्या मोसमात घरच्या मैदानावर पहिला विजय मिळवला आहे. आरसीबीने अखेरच्या षटकांमध्ये राजस्थान रॉयल्सवर ११ धावांनी शानदार विजय नोंदवला. तर राजस्थान रॉयल्सचा संघ पुन्हा एकदा विजयाच्या उंबरठ्यावर येऊन विजय मिळवण्यात अपयशी ठरला. ध्रुव जुरेल, शिमरॉन हेटमायर आणि शुभम दुबे अखेरच्या षटकांमध्ये संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.

आरसीबीकडून मिळालेल्या २०६ धावांचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वाल आणि ध्रुव जुरेल यांच्या दमदार खेळींमुळे राजस्थानला विजयाची आशा निर्माण झाली. पण जोश हेझलवूड आणि कृणाल पंड्या यांनी त्यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीने सामना फिरवला आणि बेंगळुरूला संस्मरणीय विजय मिळवून दिला.



राजस्थानकडून यशस्वी जैस्वालने डावाच्या पहिल्याच चेंडूवर षटकार मारून स्फोटक सुरुवात केली. जयस्वालने वैभव सूर्यवंशीसोबत मिळून फक्त पाचव्या षटकात संघाला ५० धावांचा टप्पा ओलांडून दिला. त्यानंतर नितीश राणानेही आक्रमक फलंदाजी सुरू केली. जोश हेझलवूडने जैस्वालची विकेट घेत बंगळुरूला मोठा दिलासा दिला. पण नितीश आणि कर्णधार रियान पराग यांनीही आक्रमक फलंदाजी केली आणि ९ व्या षटकापर्यंत संघाला ११० धावांपर्यंत पोहोचवले. कृणाल पंड्याने रियान परागची विकेट घेतली आणि त्यानंतर फिरकीपटूंनी चांगली गोलंदाजी केली. कृणालने नितीशलाही बाद केलं. यानंतर, जबाबदारी ध्रुव जुरेल आणि शिमरॉन हेटमायरवर आली, जे गेल्या २ सामन्यांमध्ये पराभवाचे खलनायक ठरले होते. त्यानंतर १८ व्या षटकात, जुरेलने भुवनेश्वर कुमारच्या षटकात २२ धावा काढून संघाला सामन्यात कायम ठेवले. पण १९ व्या षटकात पुन्हा सामना फिरला. हेझलवुडने प्रथम जुरेल आणि नंतर जोफ्रा आर्चरला पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले आणि फक्त १ धाव दिली. ध्रुव जुरेल ३४ चेंडूत ३ चौकार आणि ३ षटकारांसह ४७ धावा केल्या. यानंतर हेझलवुडने आर्चरला झेलबाद करत १९ व्या षटकात २ विकेट घेत १ धाव दिली. २० व्या षटकात आवश्यक असलेल्या १७ धावा राजस्थानच्या आवाक्याबाहेर राहिल्या आणि राजस्थानला १९४ धावांवर रोखून संघाला संस्मरणीय विजय मिळवून दिला.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने प्रथम फलंदाजी करताना ५ विकेट्स गमावत २०५ धावांचा टप्पा ओलांडला. विराट आणि सॉल्टने पॉवरप्लेमध्ये संघाला ५० धावांचा टप्पा गाठून दिला. फिल सॉल्ट २६ धावा करत बाद झाला. तर विराट कोहलीने ७० धावांची खेळी केली. विराट कोहलीने ४३ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ७० धावा केल्या. तर देवदत्त पडिक्कलने चांगली फलंदाजी करत २७ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ५० धावा केल्या. यानंतर टीम डेव्हिड २३ धावा तर जितेश शर्माने २० धावांची खेळी करत संघाला २० धावांचा टप्पा गाठून दिला. राजस्थानकडून संदीप शर्माने २ विकेट्स घेतले. तर आर्चर आणि वानिंदू हसरंगाला १–१ विकेट घेता आली.



सावई : विजेत्या पाली – सावईवेरे येथील खामिणी संघास चषक देताना विनायक वेंगुर्लेकर, राजेंद्र नाईक, हिरू नाईक, अँथोनी डायस, समीर नाईक, अनिल नाईक, प्राची नाईक व प्रशांत नाईक.

# टेनिस बॉल क्रिकेटचे खामिणी क्रिकेटर्सला अजिंक्यपद सख्याहरी संघाला उपविजेतेपद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. २५ :** फोणचेभाट – सावई येथील दीपक स्पोर्ट्स क्लब आयोजित आठव्या विद्युत झोतातील वॉर्ड वाईज टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे जेतेपद पाली – सावईवेरे येथील खामीणी क्रिकेटर्सने पटकावले. अत्यंत रोमांचक झालेल्या अंतिम सामन्यात खामिणी क्रिकेटर्सने सख्याहरी ७७७ संघावर मात करीत रोख ३० हजार ३० रुपये आणि आकर्षक चषक पटकावला. उपविजेत्या सावईवेऱ्याच्या

सख्याहरी संघाला रोख १५ हजार १५ व चषक देण्यात आला.

दीपक स्पोर्ट्स क्लब आयोजित या स्पर्धेला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत गोव्यातील अव्वल अशा २८ संघांनी सहभाग घेत आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडवले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून वळवई पंचायतीचे सरपंच विनायक वेंगुर्लेकर तर अन्य मान्यवर म्हणून क्लबचे सदस्य राजेंद्र नाईक, हिरु नायक, अँथोनी डायस, प्रा.समीर नाईक, अनिल नाईक, सावई सरकारी माध्यमिक विद्यालयाच्या शारीरिक शिक्षिका प्राची नाईक आणि क्लबचे अध्यक्ष प्रशांत नाईक उपस्थित होते.

सर्व मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. यंदा स्पर्धेतील सर्व बक्षिसे क्लबच्याच सदस्यांनी पुरस्कृत करून अभिनव पायंडा पाडल्याबद्दल प्रमुख पाहुणे विनायक वेंगुर्लेकर यांनी सर्व पुरस्कर्त्यांचे आभार मानून अभिनंदन केले व सहभागी सर्व संघांचे कौतुक केले. यावेळी उपांत्य फेरीत पराभूत झालेल्या पाली थ्री आणि साईदीप क्रिकेटर्स यांनाही रोख ५ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. तत्पूर्वी दीपक स्पोर्ट्स क्लबने ग्रामपंचायत पातळीवर आयोजित केलेल्या व्हीपीएल( वळवई प्रीमिअर लीग ) स्पर्धेचेही बक्षीस वितरण करण्यात आले. ज्यात हाळीवाडा क्रिकेटर्सने शांतादुर्गा क्रिकेटर्स सातेरीभाटचा सुपर ओव्हर मध्ये पराभव करत आकर्षक चषक पटकावला.

वॉर्ड वायज स्पर्धेत उत्कृष्ट गोलंदाज – कृपेश पालकर, उत्कृष्ट फलंदाज – सनिकेत पालकर, सुरेंद्र नाईक यांनी आपले बंधू दिवंगत पत्रकार रवींद्र नाईक स्मरणार्थ पुरस्कृत स्पर्धावीर पुरस्कार सनिकेत पालकर यांना तर राजू शिरोडकर यांनी आपलें दिवंगत वडील शिवदास शिरोडकर स्मृती पुरस्कृत दीपक चॅम्प पुरस्कार कृपेश पालकर यांना प्राप्त झाला. बक्षीस वितरण सोहळ्याचे सूत्रनिवेदन शेखर नाईक यांनी केले तर क्लबचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांनी आभार मानले.

# *पहलगाम हल्ल्यापूर्वी अर्शदला दिले होते निमंत्रण*

## भालाफेकपटू नीरज चोप्राकडून स्पष्ट : आता पाक भालाफेकपटू येण्याचा प्रश्नच नाही

**मुंबई, दि. २५ :** दोन वेळा भालाफेक करणारा ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्राने पाकिस्तानी भालाफेकपटू अर्शद नदीमला स्पर्धेसाठी आमंत्रित करण्याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्याने सांगितले की, पहलगाम हल्ल्यापूर्वी अर्शद नदीमला निमंत्रण पाठवण्यात आले होते. देश आणि त्याचे हित प्रथम येतात.

चोप्राने पॅरिस ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता अर्शद नदीमला २४ मे रोजी बेंगळुरू येथे होणाऱ्या एनसी क्लासिक भालाफेक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले होते. त्यानंतर चोप्राच्या देशभक्तिवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

सोशल मीडियावर त्याच्या कुटुंबाला लक्ष्य केले जात आहे. त्याला ट्रोल केले जात आहे. सोशल मीडियावर असे पसरवले जात आहे की पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ जणांची हत्या केली, त्यानंतरही ते पाकिस्तानी भालाफेकपटूला



भारतात येण्याचे आमंत्रण देत आहेत.

नीरज चोप्रा यांनी सोशल मीडियावर जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अर्शद नदीमला नीरज चोप्रा क्लासिकमध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्याच्या माझ्या निर्णयाची खूप चर्चा होत आहे. मला ट्रोल केले जात आहे आणि माझ्याविरुद्ध द्वेष पसरवला जात आहे. माझे कुटुंबही यातून सुटले नाही. मी अर्शदला दिलेले आमंत्रण एका खेळाडूकडून दुसऱ्या खेळाडूला होते, यापेक्षा जास्त काही नाही.

एनसी क्लासिकचे उद्दिष्ट सर्वोत्तम खेळाडूंना भारतात आणणे आणि आपल्या देशाला जागतिक क्रीडा स्पर्धेचे माहेरघर बनवणे हे होते. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या दोन दिवस आधी हे निमंत्रण पाठवण्यात आले होते. गेल्या ४८ तासांत जे काही घडले आहे, त्यानंतर अर्शदची एनसी क्लासिकमध्ये उपस्थिती हा प्रश्नच नाही. माझा देश आणि त्याचे हित नेहमीच प्रथम येतील.

नीरजने आपल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, मी इतक्या वर्षांपासून माझ्या देशाची अभिमानाने काळजी घेतली आहे. आज माझ्या प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे, मला याचे वाईट वाटते. माझ्या कुटुंबाला लक्ष्य केले जात आहे. आपण सामान्य माणसे आहोत.

नीरज चोप्रा यांनी २१ एप्रिल रोजी एका व्हर्च्युअल पत्रकार परिषदेत २४ मे रोजी बेंगळुरू येथे होणाऱ्या एनसी क्लासिक भालाफेक स्पर्धेबद्दल माहिती दिली होती आणि सांगितले होते की पाकिस्तानी भालाफेकपटू अर्शद नदीमला या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. मी त्याच्याशी बोललो आहे, त्याने त्याला त्याच्या प्रशिक्षकाशी बोलण्यास सांगितले आहे आणि नंतर यावर उत्तर देण्यास सांगितले आहे.

पाकिस्तानी ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू अर्शद नदीमने एनसी क्लासिक भालाफेक स्पर्धेत भाग घेण्यास नकार दिला आहे. अर्शदने वृत्तसंस्थेला सांगितले की, एनसी क्लासिक स्पर्धा २४ मे रोजी आहे, तर मी २२ मे रोजी आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी कोरियाला रवाना होणार आहे. २७ ते ३१ मे दरम्यान कोरियामध्ये होणाऱ्या आशियाई चॅम्पियनशिपसाठी तो कठोर परिश्रम करत असल्याचे त्याने सांगितले. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर अर्शदचे हे विधान आले आहे.

# मी तर आयपीएल खेळणार : आमिर

**कराची, दि. २५ :** भारतात इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेचा १८ वा हंगाम सध्या सुरू आहे. तसेच पाकिस्तानमध्ये सुद्धा पीएसएल स्पर्धेचा १० वा हंगाम खेळला जात आहे. कितीही अंतर असले तरी पाकिस्तान पीएसएलची तुलना आयपीएल स्पर्धेशी करतातच आणि पीएसएलला आयपीएल पेक्षा अधिक चांगले ठरवण्याचा प्रयत्न करतात. पण पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज मोहम्मद आमिरने त्यांच्या वक्तव्याने पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेला थट्टा बनवले आहे.

३३ वर्षीय मोहम्मद आमिरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. तो आता लीग क्रिकेट स्पर्धा खेळतो. आमिरने त्याच्या आता केलेल्या वक्तव्यामध्ये स्पष्ट केल आहे की, तो आयपीएल स्पर्धेत खेळण्यासाठी इच्छुक आहे. आमिरची पत्नी नर्जिस खातून इंग्लंडची नागरिक आहे. त्यामुळे त्याला आशा आहे की, त्याला इंग्लंडचे नागरिकत्व मिळेल ज्यामुळे त्याच्यासाठी आयपीएल स्पर्धेचे



दरवाजे उघडतील.

आमिर म्हणाला, खरं सांगायचं तर जर मला संधी मिळाली तर मी नक्कीच आयपीएल स्पर्धा खेळेल आणि मी हे अगदी स्पष्टपणे म्हणत आहे. तसेच जर मला आयपीएलमध्ये संधी नाही भेटली तर मी पीएसएल खेळेल. पुढच्या वर्षी माझ्याकडे आयपीएल खेळण्याची संधी असेल? जर असं झालं तर, मी नक्कीच आयपीएल खेळेल.

मोहम्मद आमिरला वाटत आहे की, पुढच्या वर्षी आयपीएल आणि पाकिस्तान सुपर लीग एकाच वेळी नाही खेळली जाणार, जे ह्यावेळी एकाच वेळी खेळले जात आहे. पुढे तो म्हणाला, मला नाही वाटत की पुढच्या वर्षी आयपीएल आणि पीएसएल स्पर्धा एकाच वेळी खेळली जाईल,

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २३३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 233 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .